**सा.प्रगत भारत**
वृत्तपत्राचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दोन वर्षे-१०००/- रूपये अधिक माहिती वसंपर्क-९८६०८७७७८९दररोजच्या ताज्या बातम्या पहा.. खालील वेब पोटर्स न्युज ..www. pragatbhart.com

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789




● वर्ष:१८ ● अंक क्र. ४४ ● साप्ताहिक ● मंगळवार दि. २ ते ८ जून २०२६ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन



**अहिल्यानगर:-**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता.जामखेड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केले. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अभिवादन केले.याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सुरेश धस, आमदार काशिनाथ दाते आदी उपस्थित होते.याप्रसंगी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक व त्याच परिसरातील महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

## दापोडीतील विषारी दारू मृत्यू प्रकरणाचा तपाससीआयडीकडे.मृतांचा आकडा पंधरा..

**पुणे:-**पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू सेवनामुळे झालेल्या मृत्यू प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) वर्ग करण्यात आला आहे.

दापोडी आणि हडपसर परिसरातील या धक्कादायक घटनांप्रकरणी दाखल गुन्ह्यांचा तपास आता सीआयडीमार्फत करण्यात येणार असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.दापोडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हडपसर पोलीस ठाण्यातही संबंधित कलमानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार २९ मे २०२६ रोजी हे दोन्ही गुन्हे सीआयडीकडे वर्ग करण्यात आले आहेत.या प्रकरणात दापोडी परिसरातील आतापर्यंत ११ जणांचा, तर हडपसर परिसरातील ४ जणांचा मृत्यू झाला असून मृतांचा आकडा १५ वर पोहोचला आहे. दापोडी पोलीसांनी सहा आरोपींना अटक केली असून या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास सीआयडी, पुणे करत आहे.




# अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा समाजाने अंगीकारण्याची गरज-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## श्रीक्षेत्र चौंडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती महोत्सव

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com



**अहिल्यानगर:-**छत्रपतीशिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून देशभर केला.त्यांनी अंधश्रद्धेला कधीही थारा दिला नाही आणि समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारण्याची समाजाला गरज आहे,असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती महोत्सवात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे,खासदार रामराव वडकुते,आमदार सर्वश्री काशिराम दाते,मोनिका राजळे, सुनील कर्जतकर, गोपीचंद पडळकर, विठ्ठलराव लंघे, किरण लहामटे, हेमंत ओगले,अमोल खताळ, अक्षय कर्डिले,उत्तमराव जानकर, नारायण पाटील,बाबासाहेब देशमुख, सचिन कांबळे,तसेच माजी मंत्री अण्णासाहेब डांगे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राचा अभिमान, शौर्य, त्याग व समर्पण यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत.चौंडीची माती त्यांच्या जन्माने पावन झाली आहे. त्या न्यायप्रियता आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या युगप्रवर्तक होत्या. त्यांचा राज्यकारभार आदर्शवत होता.जनतेवर त्यांनी आईप्रमाणे माया केली. तीनशे वर्षांनंतरही देश त्यांचे स्मरण करत आहे.त्यांनी मानवधर्म जपला. अहिल्यादेवींनी अनेक वैयक्तिक आघात सहन केले; मात्र त्यातून खचून न जाता आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे. गोदा ते नर्मदा अहिल्यादेवी जलयात्रा शासनाने आयोजित केली.अहिल्यादेवी या दूरदृष्टी असलेल्या राज्यकर्त्या होत्या. त्यांनी समाजाच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.अहिल्यादेवी या हिंदुत्वाचा हुंकार व शौर्याचे प्रतीक होत्या.त्यांची न्यायप्रियता, लोककल्याणकारी राज्यकारभार व जनसेवेचा वारसा आपल्यासाठी आदर्श आहे. त्यांनी सत्तेपेक्षा सेवेला आणि वैभवापेक्षा जनकल्याणाला प्राधान्य दिले. आपल्या कार्यकाळात देशभरात मंदिरे, घाट,धर्मशाळा व जलसंवर्धनाची अनेक कामे उभी केली. जलसंवर्धन क्षेत्रातील त्यांचे कार्य आजही मार्गदर्शक ठरते. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून जलसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या निधनाचे मोठे आघात सहन करूनही त्यांनी स्वतःचे दुःख बाजूला ठेवत कर्मयोगी वृत्तीने जनसेवा केली, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्षे आदर्श राज्यकारभार केला. त्यांनी न्यायदानाची भक्कम व्यवस्था उभी केली. देशभरातील धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार स्वतः च्या निधीतून केला. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले. समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी कार्य करताना त्यांनी लोकसेवा आणि जनहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचे कार्य आजही आदर्शवत मानले जाते.माहेश्वरी वस्त्रउद्योगाला चालना देऊन रोजगारनिर्मिती केली. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महिला सैन्य तुकडी उभारण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतला. त्या पुढे म्हणाल्या,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी स्वतःसाठी धनखर्च न करता समाजकल्याणासाठी संपत्तीचा उपयोग केला. त्यामुळेच त्यांना 'लोकमाता' म्हणून ओळखले जाते. गोदा ते नर्मदा या अहिल्यादेवी जलयात्रेचा शुभारंभ यावर्षी चौंडी येथून करण्यात आला.**(पान क्रमांक-२ वर क्रमशः)**

# अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणास चर्मकार समाज हाणून पाडणार; आळंदी येथील राज्यव्यापी महाबैठकीत आरपारच्या लढ्याची हाक




**आळंदी:**अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे 'अ-ब-क-ड' उपवर्गीकरण करण्याचा डाव चर्मकार समाज एकजुटीने पूर्णपणे हाणून पाडणार,असा एकमुखी निर्धार श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथे व्यक्त करण्यात आला. 'समस्त हराळे वैष्णव समाज धर्मशाळा' संस्थान येथे संस्थेच्या वतीने व कष्टकऱ्यांचे नेते डॉ.बाबा कांबळे यांच्या पुढाकाराने चर्मकार समाजाची राज्यव्यापी ऐतिहासिक महाबैठक पार पडली. या बैठकीचे अध्यक्ष व समाजाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बबनराव घोलप यांची यांनी भूषवले,त्यांच्या अध्यक्षतेखाली ही ऐतिहासिक बैठक पार पडली,लवकरच मुंबई येथे राज्यवापी आंदोलन उभारले जाईल,असे घोषणा,यावेळी बबनराव घोलप यांनी केले,तसेच यावेळी माजी आमदार बाबुराव माने यांनी चर्मकार समाजाने आंबेडकरी समाजासमवेत या लढ्यात पुढाकार घेण्याची महत्त्वाची भूमिका मांडली.

संविधानाने दिलेले हक्क आणि आरक्षण वाचवण्यासाठी चर्मकार समाजाने आंबेडकरी समाजाच्या खांद्याला खांदा लावून या लढ्यात पुढाकार घेतला पाहिजे.असे संजय खामकर यांनी सांगितले''

महाराष्ट्रमध्ये चर्मकार समाजाची मोठी संख्या आहे.चर्मकार समाजावर अन्याय होऊ देणार नाही.चर्मकार समाजाची लोकसंख्या कमी दाखवून आरक्षण हिसकावण्याचा प्रयत्न कोणीही करू नये,असे ठाम मत डॉ.बाबा कांबळे यांनी व्यक्त केले.

उपवर्गीकरण विरोधातील या भूमिकेमुळे शासनाला हा निर्णय मागे घ्यायला भाग पाडावे लागेल, असे मत मुख्य वक्ता राहुल डंबाळे यांनी व्यक्त केले.

तर राष्ट्रीय चर्मकार महासंघ महिला आघाडीच्या नेत्या तथा राष्ट्रीय सल्लागार डॉ.ऊर्मिलाताई ठाकरे म्हणाल्या की,उपवर्गीकरण होवू नये म्हणून संपूर्ण समाज रस्त्यावर उतरून जन आंदोलन करेल व सरकारच्या विरूद्ध प्रचंड मोठा आक्रोश मोर्चा काढू आणि मागासवर्गीयांच्या उपवर्गीकरणाचा डाव हाणून पाडू,असे त्यांनी प्रतिपादन केले.

**बैठकीत मंजूर करण्यात आलेले महत्त्वपूर्ण ठराव:१. आरक्षण उपवर्गीकरणास तीव्र विरोध:**अनुसूचित जातीच्या आरक्षणात अंतर्गत विभागणी करून समाजाची ताकद कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न चर्मकार समाज सहन करणार नाही. हा डाव रस्त्यावर उतरून हाणून पाडण्याचा संकल्प समाज बांधवांनी केला आहे.

**२.जनगणनेतील त्रुटींवर कारवाईची मागणी:**शासकीय जनगणनेमध्ये चर्मकार समाजाची लोकसंख्या तब्बल ६० टक्क्यांनी कमी दाखवून अन्याय केला गेला आहे. हे गंभीर षडयंत्र रचणाऱ्या आणि चुकीची आकडेवारी नोंदवणाऱ्या दोषी यंत्रणेवर व अधिकाऱ्यांवर तत्काळ कडक कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.**३. आंबेडकरी आंदोलनांना पाठिंबा:** संविधानाने दिलेले हक्क आणि आरक्षण वाचवण्यासाठी महाराष्ट्रात सुरू असलेल्या सर्व आंबेडकरी चळवळी व आंदोलनांना चर्मकार समाजाने आपला अधिकृत व जाहीर पाठिंबा दिला आहे.

४.सरकारने ज्याप्रमाणे टी.व्ही वर रामायण दाखवले त्याप्रमाणे ''संविधान''सुद्धा टी.व्ही.वर दाखवावे व समाजाला सजग करावे.यामाध्यमातूनजनतेला आपल्या मूलभूत अधिकाराची जाणीव होईल.आपल्या हक्कासाठी ते पेटून उठतील. सूचक-डॉ.ऊर्मिलाताई ठाकरे

**५.मुंबईत धडकणार विराट आंदोलन:**आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आणि शासनाला जागे करण्यासाठी लवकरच संपूर्ण महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाज मुंबईत एकत्र येऊन भव्य ऐतिहासिक आंदोलन करून आक्रोश करणार आहेत.

यावेळी बैठकीचे अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री ज्येष्ठ नेते बबनरावजी घोलप, माजी आमदार बाबुराव माने,भाऊसाहेब कांबळे,भारतीय धर्मसंघटक राष्ट्रीय अध्यक्ष सुखदेवजी वाघमारे,कष्टकऱ्यांचे नेते,डॉ. बाबा कांबळे, आंबेडकरी चळवळीतील नेते राहुल डंबाळे, चर्मकार विकास संघाचे अध्यक्ष संजय खामकर, चर्मकार विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे, ग्राहक कल्याण समिती महामंडळाचे माजी अध्यक्ष सूर्यकांत गवळे, राष्ट्रीय चर्मकार संघ प्रदेश अध्यक्ष शांताराम कारंडे, महिला आघाडीच्या नेत्या डॉ.उर्मिला ठाकरे, स्वाभिमानी चर्मकार संघाचे अध्यक्ष सुरेश पोटे, राजू बनसोडे, अरुण माने, आनंद गवळी, ॲड.नारायण गायकवाड, विजय घासे, अंकुश आंबेकर, दिनेश जाधव, रवींद्र खैरे, संतोष टोनपे, जयदेव इसवे, सुदामा लोखंडे, दत्तात्रेय गोतीचे, अनिल कानडे, गजानन निंबोरे, सुभाष सोनवणे, राम कदम, रुक्मणी ननवरे

**(पान क्रमांक-२ वर क्रमशः)**

ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

## संपादकीय

### उष्माघाताने देशभरात दीडशेहून अधिक लोक मृत्यूमुखी...?

**आपल्या देशामधील विविध राज्यामधील वर्षामधील तीन ऋतू असतात यामध्ये पावसाळा,हिवाळा,ऊन्हाळा ही तीन मुख्य ऋतू असतात यामध्ये आजच्या घडीला म्हणजेच मे अखेर उन्हाळा हा संपन्याचा मार्गात असताना व जुन महिना लागत असतान उष्णतेच्या लाटेने यंदा देशभरातच हाहाकार उडवला. तब्बल दोन महिन्यांपासून महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत सूर्याचा प्रकोप सुरू आहे. उष्माघाताने देशभरात दीडशेहून अधिक बळी गेले. यापैकी निम्म्याच्या आसपास बळी एकट्या महाराष्ट्रातीलच आहेत. नागपूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्ह्यांतच ५० हून अधिक लोक उष्माघाताने मृत्युमुखी पडले. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला भाजून काढणारी ही उष्णतेची लाट आणखी दोन दिवस कायम राहणार, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मान्सूनच्या आगमनापर्यंत महाराष्ट्राची होरपळ व उष्माघाताचा धोका कायम राहील, असे दिसते!**

**यावर्षीच्या उन्हाळ्याने अक्षरश:कहर केला आहे. महाराष्ट्रासह देशभरातच गेले दोन महिने सूर्य आग ओकत आहे.तापमानाने यापूर्वीचे सर्व उच्चांक मोडीत काढले. तब्बल दोन महिन्यांपासून उष्णतेची लाट मुक्कामाला असल्याने गेल्या दोन महिन्यांत ७० हून अधिक लोकांचा बळी गेला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यावर सूर्याचा सर्वाधिक प्रकोप दिसतो आहे. विदर्भात नागपूर, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा आणि मराठवाड्यात हिंगोली, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर व उत्तर महाराष्ट्रात जळगाव, धुळे जिल्हे प्रचंड तापमानामुळे अक्षरशः भाजून निघाले आहेत. एरव्ही उन्हाळ्याच्या चार महिन्यांच्या काळात दरवर्षी साधारण ८ ते १५ दिवस उष्णतेची लाट असते. एप्रिल ते मे महिन्यातील हे १५ दिवस उन्हापासून बचाव करण्यासाठी काळजी घ्यावी लागायची. मात्र यंदा उष्णतेची लाट ओसरण्याचे नावच घेत नाही. एप्रिल आणि मे हे सलग दोन महिने म्हणजे तब्बल ६० दिवसांपासून महाराष्ट्रातील जनता उष्णतेच्या लाटेला तोंड देत आहे. शिवाय आणखी आठ–दहा दिवस तरी ही लाट कमी होण्याची कुठलीही चिन्हे दिसत नाहीत. उलट अखेरच्या टप्प्यात उष्णता आणखी वाढते आहे. उन्हाळ्यातील सर्वाधिक उष्णतेचे नऊ दिवस सोमवारपासून सुरू झाले. याला विदर्भात 'नवतपा' म्हणतात. नवतप्याच्या पहिल्याच दिवशी विदर्भाने ४७ अंश सेल्सिअसचा पारा ओलांडला. चंद्रपूर जिह्यातील ब्रह्मपुरी येथे देशातील सर्वाधिक म्हणजे ४७.६ अंश सेल्सिअस इतक्या**

**तापमानाची नोंद–झाली. ब्रह्मपुरी शहराची सलग दोन दिवस देशा–तील सर्वात उष्ण शहर अशी नोंद झाली. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात विदर्भाचे अक्षरशः भट्टीत रूपांतर झाले आहे. सुखवस्तू कुटुंबांचे ठीक आहे, पण रस्त्यावर पुलाखाली, फुटपाथवर राहणाऱ्या गोरगरीबांचे व शेतात उन्हातान्हात काम करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. अमरावतीमध्ये गेल्या २४ तासांत तब्बल सात जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला. यापैकी बहुतांश सर्वच जण बेवारस व बेघर होते. यवतमाळ जिह्यातही गेल्या तीन दिवसांत उष्माघाताने ११ जण मृत्युमुखी पडले. शनिवारी एकाच दिवशी चौघांचा उष्णतेच्या लाटेने बळी घेतला. यवतमाळ जिह्याच्या दिग्रस शहरात वेगवेगळ्या तीन ठिकाणी तीन जणांचे मृतदेह रस्त्यावर आढळले. हे उष्माघाताचेच बळी असल्याचे सांगण्यात येत आहे. नागपूरमध्ये दररोज सरासरी तीन निष्पाप जिवांचा उष्माघाताने बळी जात आहे. गेल्या आठ दिवसांत तब्बल २६ अनोळखी व्यक्तींचा रस्त्यावर मृत्यू झाला. नागपूर जिह्यातील सावनेर येथेही उष्माघाताने दोन जणांचा मृत्यू झाला. चंद्रपूर जिह्याच्या भद्रावती तालुक्यात उष्माघाताने दोन जणांचा बळी घेतला. मराठवाड्यातील हिंगोली जिह्यात सेनगाव येथे उष्माघाताने एका ४८ वर्षीय व्यक्तीचा, तर उत्तर महाराष्ट्रात जळगाव जिह्यात एका सेंट्रिंग कामगारासह चार जणांचा मृत्यू झाला. पुणे जिल्हा तसा राज्याच्या**

**अन्य भागांच्या तुलनेत–कमी तापमानाचा भाग म्हणून ओळखला जातो. मात्र या वर्षी पुण्यातही तापमानाने उच्चांक गाठला. पुणे शहर व जिह्यात दोन जण उष्माघाताने मृत्युमुखी पडले. आणखी उष्णतेची तीव्र लाट कायम असेल,असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे उष्माघाताचा धोका अजून टळलेला नाही. जगातील सर्वात उष्ण ५० शहरांच्या यादीतील सर्व ५० शहरे भार–तातील असून यात निम्म्याहून अधिक शहरे एकट्या उत्तर प्रदेशातील आहेत.महाराष्ट्रातील चंद्रपूर शहराचा यात समावेश आहे. याशिवाय छत्तीसगड,बिहार,तेलंगणा,हरयाणा आणि मध्य प्रदेशातील अनेक शहरांचा या यादीत समावेश आहे.महाराष्ट्राबरोबरच तेलंगणा,उत्तर प्रदेश व अन्य राज्यांतही उष्माघाताने ७० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.उष्णतेच्या लाटेने यंदा देशभरातच हाहाकार उडवला.तब्बल दोन महिन्यांपासून महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत सूर्याचा प्रकोप सुरू आहे. उष्माघाताने देशभरात दीडशेहून अधिक बळी गेले. यापैकी निम्म्याच्या आसपास बळी एकट्या महाराष्ट्रातीलच आहे.नागपूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर या जिह्यांतच ५० हून अधिक लोक उष्माघाताने मृत्युमुखी पडले. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला भाजून काढणारी ही उष्णतेची लाट आणखी  दिवस कायम राहणार, असा इशारा हवामान खात्याने दिला आहे. मान्सूनच्या आगमनापर्यंत महाराष्ट्राची होरपळ व उष्माघाताचा धोका कायम राहील, असे दिसते!**

## अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा समाजाने अंगीकारण्याची गरज–उपमुख्यमंत्री शिंदे

**(पान क्रमांक–१ वरून क्रमश:)**

प्रास्ताविकात विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीचे विशेष महत्त्व आहे. जयंती महोत्सवानिमित्त तीन दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आयुष्यभर लोककल्याण,न्यायनिष्ठ प्रशासन आणि समाजहितासाठी कार्य केले. त्यांच्या कार्यातून समाजाला आजही प्रेरणा मिळते. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचा आणि कार्यपद्धतीचा आदर्श घेऊन समाजहितासाठी योगदान देण्याची गरज आहे.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्यामुळे आजही संपूर्ण समाजाला प्रेरणा मिळत आहे. चौंडी ही केवळ त्यांची जन्मभूमी नसून प्रेरणास्थळ आहे. त्यांनी समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी केलेले कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजाच्या विकासासाठी व सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे.यावेळी खासदार रामराव वडकुते, आमदार गोपीचंद पडळकर आणि माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## चर्मकार अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणास चर्मकार समाज हाणून पाडणार;आळंदी येथील राज्यव्यापी महाबैठकीत आरपारच्या लढ्याची हाक

**(पान क्रमांक–१ वरून क्रमश:)**

यांच्यासह महाराष्ट्रातून आ–लेले अनेक दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत डॉ.बाबा कांबळे यांनी केले, तर विषयाची प्रस्तावना संजय खामकर यांनी मांडली.कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन समस्त हर–ळे वैष्णव समाज धर्मशाळा संस्थानचे कार्याध्यक्ष अनिल सातपुते, सचिव बाळासाहेब चव्हाण, उपाध्यक्ष सुखदेव सूर्यवंशी,विश्वस्त,श्रीभाऊ काळे,तुषार नेटके,दत्तात्रय शिंदे, मधुराताई डांगे,सुरेखा सुर्वे,व्यवस्थापक व पुजारी,नारायण गाडेकर,संदिपान महाराज घायाळ, सुदाम कांबळे,संतोष वाघमारे, सागर भोसले आणि सुनील कदम,यांनी केले. आभार तुषार नेटके यांनी मानले,अमोल वाघमारे यांनी प्रस्ताव,मांडला प्रस्तावाला अनुमोदन, अनिल सातपुते यांनी दिले.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ३८४४ रुग्णांना सुमारे ३१.१९ कोटींची मदत–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती




**अहिल्यानगर:**शासनाच्या **आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.२० गंभीर आजारासाठी मदतकॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळामुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.आर्थिक वर्षातील मदत१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यातील ३८४४ रुग्णांना सुमारे ३१ कोटी १९ लाख ७३ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली कक्षाचे कामकाज प्रभावीपणे सुरू आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या संख्येने रुग्णांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. अधिकाधिक गरजू रुग्णांपर्यंत मदत पोहोचवण्यावर सातत्याने भर दिला जात आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## अहिल्यादेवींचे दूरदर्शी नेतृत्व, प्रजेप्रती असलेली अपार बांधिलकी,धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि समाजहितासाठी केलेले कार्य यांचे प्रभावी चित्रण...

**पिंपरी:'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो' अशा घोषणांनी दुमदुमलेले नाट्यगृह... पारंपरिक पध्दतीने ढोल पथकाद्वारे मानवंदना....धनगरी नृत्यासह,पिंगळा,वासुदेव अशा कलाकारांनी विविध प्रसंगांतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य सादर करताना रसिकांकडून मिळणारी टाळ्यांची दाद...अशा उत्सा–हपूर्ण वातावरणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त हजारो शहरवासियांकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यात आले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पुण्यश्लोक या ७५ कलाकारांच्या भव्य महानाट्याने त्यांच्या कर्तृत्वाचा गौरवशाली वारसा रसिकांसमोर प्रभावीपणे उभा केला.लोककल्याण,न्यायनिष्ठा, स्वाभिमान आणि आदर्श प्रशास–नाचा अजरामर वारसा जपणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त महापालिकेच्या वतीने सांगवी येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात भव्य महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

या महानाट्याची सुरुवात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.यावेळी नगरसदस्य माऊली जगताप, कार्यकारी अभियंता विजय भोजने, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह माजी नगरसदस्य राजू दुर्गे,पुण्यश्लोक फाउंडेशनचे धनंजय तानले,सामाजिक कार्यकर्ते अशोक खरात,सूर्यकांत गोफणे, नवनाथ बिडे,अभिमन्यू गाडेकर, विना सोनवलकर,अजय दुधभाते, बिरू व्हनमाने,सचिन सरक, दिपक भोजने, भरत महानवर,विजय महानवर,सुनिल माने,विजय अर्जुन,सुमेध कावळे,देवराम बिरगड,विठ्ठल देवकाते यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

पुण्यश्लोक या महानाट्याच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या सुवर्णपानांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. सुमारे ७५ कलाकारांच्या सहभागातून साकारलेल्या या महानाट्याने उपस्थित प्रेक्षकांना इतिहासाच्या वैभवशाली दालनात घेऊन जाण्याचा अविस्मरणीय अनुभव दिला.अहिल्यादेवींचे दूरदर्शी नेतृत्व,प्रजेप्रती असलेली अपार बांधिलकी,धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि समाजहितासाठी केलेले कार्य यांचे प्रभावी चित्रण रंगमंचावर उभे राहिले. नेत्रदीपक अभिनय, भव्य नेपथ्य, सुरेख प्रकाशयोजना आणि भावस्पर्शी संगीत यांच्या संगमातून साकारलेल्या या महानाट्याने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. प्रत्येक प्रसंगातून अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वातील धैर्य,करुणा,न्यायप्रियता आणि लोककल्याणकारी विचारांचा प्रत्यय उपस्थितांना आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे आजच्या पिढीसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत असून त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने अंगीकारावा, असा संदेश या महानाट्याद्वारे देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी महानाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाचे कौतुक केले.लोककला, शाहिरी आणि ढोलवादनातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा जागरपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विचार प्रबोधन पर्व' अंतर्गत मोरवाडी चौक, पिंपरी येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.


या कार्यक्रमाची सुरुवात अंबादास पडळकर व त्यांच्या ३० सहकाऱ्यांनी सादर केलेल्या आकर्षक गजनृत्याने झाली. त्यानंतर सामना ढोलपथक,मुंबई यांच्या वतीने ढोलवादनाच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अनोखे अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.तसेच 'सुवर्ण महाराष्ट्राचा लोकोत्सव' या विशेष कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविण्यात आले. भूपाळी, वासुदेव, पिंगळा, वाघ्या–मुरळी, धनगरी नृत्य, शाहिरी पोवाडे, आदिवासी आणि डोंबारी अशा विविध लोककला व व्यक्तीछटांच्या सादरीकरणाने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.यानंतर शाहिरी कार्यक्रमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा जागर घडवून आणण्यात आला. या सर्व कार्यक्रमांमधून लोककला, इतिहास आणि सांस्कृतिक वारसाचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी नागरिकांना मिळाली.

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे–१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे–मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे–१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



## पुण्यात रात्री १० नंतर हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाऊ गल्ल्या बंद! पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांचे कडक आदेश

**पुणे:**पुणे शहरात कायदा–सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि रात्रीच्या वेळी घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांना आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी अत्यंत कडक पावले उचलली आहेत. शहरातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, रस्त्यावरील फेरीवाले आणि खाऊ गल्ल्या रात्री १० वाजल्यानंतर बंद करण्याचे आदेश पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले आहेत. शनिवार पासूनच या आदेशाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून १० वाजता सर्व फेरीवाल्यांना व्यवहार बंद करावे लागणार आहेत. मात्र, मोठ्या हॉटेल्सना रात्री साडेदहा ते अकरा वाजेपर्यंत मर्यादित सवलत असणार आहे.गुन्हेगारी वाढल्याचे 'नेरेटिव्ह' खोटे  पोलीस आयुक्त: पुण्यातील बालाजीनगर परिसरात रिक्षाचालकावर झालेल्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर शहरात भीतीचे वातावरण होते. मात्र, आयुक्त अमितेशकुमार यांनी स्पष्ट केले की, पुण्यात गुन्हेगारी वाढल्याचे पसरवले जाणारे 'नेरेटिव्ह' पूर्णपणे खोटे आहे. २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये पुण्यातील गुन्हेगारीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. नुकतीच झालेली गोळीबाराची घटना ही टोळीप्रमुख सूर्यकांत आंदेकर याच्या सांगण्यावरून पूर्ववैमनस्यातून घडली होती. पोलिसांनी १०० हून अधिक गुन्हेगारांना जेरबंद केले असून, 'डायल १११' वरून कॉल आल्यानंतर पोलीस अवघ्या ७ मिनिटांत घटनास्थळी पोहोचत आहेत.१४ दिवस जमावबंदी आणि बेपत्ता मुलींचा शोध: शहरात २६ मे पासून पुढील १४ दिवसांसाठी नियमित प्रक्रियेचा भाग म्हणून जमावबंदी लागू करण्यात आली आहे. इंधन तुटवड्यावरून राजकीय संघटनांकडून होणारी आंदोलने आणि सण–उत्सवांच्या काळात शांतता राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. याचदरम्यान आयुक्तांनी बेपत्ता मुलींच्या तपासाबाबत माहिती दिली. शहरात बेपत्ता झालेल्या ४९ मुलींपैकी ३८ मुलींचा पोलिसांनी २४ तासांत शोध घेतला आहे. यातील ९९ टक्के मुली प्रेमसंबंधातून, तर केवळ १ टक्का मुली 'रील्स' बघून प्रभावित होऊन घर सोडून गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# पुणे काँग्रेसला नवी उभारी देणार; दोन शहराध्यक्षांनी स्वीकारला पदभार, डॉ.विश्वजित कदम यांचा महायुती सरकारवर थेट निशाणा



**पुणे:काँग्रेसचे नेते व माजी राज्यमंत्री आ.डॉ.विश्वजित कदम यांनी काँग्रेसने पुणे शहर पश्चिमच्या अध्यक्षपदी माजी महापौर व माजी आमदार दीप्ती चवधरी व पुणे पूर्वच्या अध्यक्षपदी माजी महापौर प्रशांत जगताप यांची नियुक्तीची घोषणा पुणे शहर येथील काँग्रेसभवन येथे करण्यात आली.यावेळी माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, पुणे मनपा गटनेते रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम,आदी उपस्थित होते**

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

**पुणे:काँग्रेसने पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी सुरू केलेल्या ‘संघटन सृजन’ अभियानांतर्गत पुणे शहरात पहिल्यांदाच पूर्व व पश्चिम असे दोन शहराध्यक्ष नेमले आहेत. हे दोन्ही नवनियुक्त शहराध्यक्ष सर्वांना सोबत घेऊन पक्षाचे काम अधिक मजबूत करतील, असा विश्वास काँग्रेसचे नेते व माजी राज्यमंत्रीमा. आ. डॉ. विश्वजित कदम यांनी शनिवारी व्यक्त केला. तसेच, पुण्याचे पुढील महापौर व खासदार हे काँग्रेसचेच असतील, असा दावाही नवनियुक्त शहराध्यक्षांनी या प्रसंगी केला.**

नुकतीच पुणे शहर पश्चिमच्या अध्यक्षपदी माजी महापौर व माजी आमदार दीप्ती चवधरी व पुणे पूर्वच्या अध्यक्षपदी माजी महापौर प्रशांत जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या दोघांनीही डॉ.कदम यांच्या उपस्थितीत अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला.

या पदग्रहण समारंभास माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, पुणे मनपा गटनेते रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम,शानी नौशाद, अमिर शेख, मेहबुब नदाफ, हनुमंत पवार,यशराज पारखी, भाऊसाहेब आजबे,नगरसेवक रफिक शेख,नगरसेवक साहिल केदारी,नगरसेवक विशाल मलके, नगरसेवक सुनिल शिंदे, नगरसेविका दिपाली डोख, नगरसेविका वैशाली भालेराव,नगरसेविका आसिया मणियार,नगरसेविका अश्विनी लांडगे,उपाध्यक्ष चंद्रशेखर कपोते, राजाभाऊ कदम, उस्मान तांबोळी, राजेंद्र भुतडा,बाळासाहेब अमराळे, संजय मोरे,अस्लम बागवान, अनिल सोंडकर, सचिन आडेकर, सतिश पवार,लता राजगुरू, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे,युवक अध्यक्ष सौरभ अमराळे,सेवादल अध्यक्ष लतेंद्र भिंगारे,एन.एस.यु.आय. अध्यक्ष अभिजीत गोरे,सोशल मिडीया अध्यक्ष गुलाम हुसेन खान, लता राजगुरू,ब्लॉक अध्यक्ष हेमंत राजभोज,अक्षय माने,रमेश सोनकांबळे, विशाल जाधव, रमेश सकट,राजू ठोंबरे,प्रदिप परदेशी, मोहसिन शेख,मजहर मणियार, विक्रम खन्ना, सुरेश कांबळे,गणेश गुगळे,अमित कांबळे,संजय मानकर,मतिन शेख,ॲड. राजश्री अडसूळ,सचिन दुर्गाडे, ऋषिकेश जाधव,चेतन पडवळ, हर्षद हांडे, देविदास लोणकर, अविनाश अडसूळ,आयुब पठाण, प्रथमेश आबनावे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कदम म्हणाले की, ‘संघटन सृजन’ या देशव्यापी अभियानाची सुरुवात महाराष्ट्रातून झाली आहे.केंद्रीय निरीक्षकांनी सर्वांशी सविस्तर चर्चा करून तयार केलेल्या अहवालाच्या आधारे या दोन्ही अनुभवी नेत्यांची निवड करण्यात आली आहे. चवधरी यांनी विधान परिषदेतही काम केले असून,हे दोन्ही शहराध्यक्ष पुणे काँग्रेसला निश्चितच नवी उभारी देतील.

शहरातील वाहतूक कोंडी, बिघडलेलीकायदा-सुव्यवस्था आणि पाणीटंचाई या सत्ताधारी भाजपच्या चुकांमुळे निर्माण झालेल्या समस्यांविरोधात काँग्रेस रस्त्यावर उतरून संघर्ष करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.वाढत्या गुन्हेग-ारीला मुख्यमंत्रीच जबाबदारकाँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. कदम यांनी राज्यातील महायुती सरकारवर अत्यंत कडक शब्दांत टीका केली. पुणे शहर, जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, महिला व चिमुरड्यांवरील अत्याचार थांबलेले नाहीत, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. ‘‘राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे ही गृहमंत्रालयाची जबाबदारी असते आणि गृहमंत्रीपद हे मुख्यमंत्र्यांकडेच असल्याने या सर्व परिस्थितीला मुख्यमंत्रीच जबाबदार आहेत,’’ असा थेट आरोप त्यांनी केला.

अनेक प्रकरणांमध्ये केवळ जलदगती न्यायालयांची घोषणा झाली, परंतु प्रत्यक्षात किती जणांना न्याय मिळाला, असा सवाल करत राज्य सरकार झोपले आहे की जागे, असा टोला त्यांनी लगावला.इंधन दरवाढ आणि युवकांचा अपमान केंद्रातील भाजप सरकारने निवडणुका संपताच पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करून सामान्य जनतेचे कंबरडे मोडले असल्याचा आरोप डॉ. कदम यांनी केला. ‘‘आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थिती मुळे इंधन दरावर परिणाम होणार याची कल्पना असूनही सरकार केवळ निवडणुकांमध्ये मग्न होते आणि मतदान संपताच अवघ्या ४८ तासांत दरवाढ करण्यात आली,‘‘ असे ते म्हणाले. याशिवाय, देशातील युवा शक्तीला झुरळ म्हणून हिणवणे हा युवकांचा अपमान आहे,असे सांगत त्यांनी सरकारवर निशाणा साधला आणि युवक काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट केले.‘नीट’ पेपर फुटीबाबत केंद्रावर निशाणावैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटीवर बोलताना डॉ. कदम यांनी केंद्र सरकारला धारेवर धरले.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या एकूणच कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या पेपर फुटीमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याचे त्यांनी सांगितले.या प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे आणि भविष्यात असा कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची हमी सरकारने द्यावी, अशी मागणी त्यांनी केली प्रारंभी काँग्रेस भवनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधीजी, स्व. इंदिराजी गांधी, स्व. यशवंतराव चव्हाण, हुतात्मा नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यांस डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर कार्यक्रमाची सुरूवात सामुहिक वंदे मातरमने झाली.याप्रसंगी पुणे पश्चिमचे अध्यक्ष दीप्ती चवधरी व पुणे पूर्वचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी त्यांच्या निवडीबाबत पक्षनेत्यांचे आभार मानून, पुणेकरांच्या हितासाठी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून आंदोलने करेल व आगामी काळात पुण्यात अनुकूल बदल घडवून आणेल असे म्हटले. कार्यक्रमास कार्यकर्त्यांने मोठी गर्दी केली होती.




# माणसाला माणूस म्हणून जगू देणे, हेच संतांचे आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ विचार; किर्तनकार ज्ञानेश्वर माऊली वाबळे महाराज यांचे प्रतिपादन

### संतांचे विचार आणि बाबासाहेबांचे आचरण हीच खरी प्रगतीची वाट;विठ्ठलनगर पुनर्वसन, पिंपरी येथे भीमजयंती निमित्त प्रबोधनात्मक कीर्तन संपन्न



विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com

पिंपरी:-‘‘माणसांपेक्षा दगडांना जास्त महत्त्व देणारा समाज वाढू लागल्याने खऱ्या वारकरी विचारांचा पराजय होत आहे. वारकरी संप्रदाय म्हणजे समता, शांती, बंधुता आणि न्याय आहे. माणसाला माणूस म्हणून जगू देणे, हेच संतांचे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ विचार होते असे प्रतिपादन प्रबोधनकार ज्ञानेश्वर माऊली वाबळे महाराज यांनी केले.

विठ्ठलनगर पुनर्वसन,पिंपरी येथे सम्यक स्वयंसेवा संस्थेच्या वतीने आयोजित तथागत भगवान गौतम बुद्ध,राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, राष्ट्रनिर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर,संत गाडगेबाबा यांच्या संयुक्त जयंती महोत्सवात ते (दि.१९)बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन सम्यक स्वयं सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रामभाऊ बनसोडे,सदस्य ललिता बनसोडे,सिद्धांत बनसोडे, ज्योती बनसोडे,कौसल्या पंडित यांनी केले होते.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते व जेष्ठ नगरसेवक राहुल भाऊ भोसले,नगरसेविका वैशालीताई घोडेकर (लोंढे),जेष्ठ पत्रकार नाना कांबळे,जेष्ठ पत्रकार बाळासाहेब ढसाळ,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर,साम टीव्हीचे प्रतिनिधी पत्रकार गोपाल मोटघरे, सुनील उर्फ बाबू कांबळे,प्रविण शिर्के,रोहित खरगे,अविनाश कांबीकर,माऊली भोसले,युनूस खतीब,विकास गायकांबळे,देवा भालके, भीमराव बरकडे, सोमनाथ काळे,मुख्याध्यापक आल्हाट,अभिमान सोनवणे, युवराज भास्कर,सैलाजात चौधरी, उर्वशी गाढवे आदींची प्रमुख उपस्थिती लाभली.

कीर्तनादरम्यान बोलताना प्रबोधनकार वाबळे महाराज म्हणाले की,महाराष्ट्राला मोठी वैचारिक परंपरा लाभली आहे. महात्मा फुले हे जगद्गुरु तुकोबारायांच्या वाटेवरून गेले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुल्यांच्या विचारांच्या वाटेवरून चालले. छत्रपती शिवाजी महाराजांनीही तुकोबारायांच्या विचारांचा वारसा जपत परकीय शाह्यांचा पाडाव केला आणि इथल्या बहुजन,तेली-तांबोळी, कुणबी समाजाला स्वराज्य मिळवून दिले.ज्ञानेश्वरांनी वेदांवर भाष्य न लिहिता गीतेवर ज्ञानेश्वरी लिहिली, कारण गीता त्यांना तथागत गौतम बुद्धांच्या धम्मपदासारखी वाटली. ज्ञानेश्वरीने समाजाला अहंकार आणि क्रोधापासून दूर राहून समता शिकवली.‘‘तु मन हे मीचि करी, माझिये भजनीं प्रेम धरी‘‘ या ओवीचा अर्थ सांगताना भजन म्हणजे केवळ टाळ वाजवणे नसून सेवा करणे हा आहे,असे त्यांनी सांगितले.बाबासाहेब विलायतला गेले पण कधी तंबाखू,पानाच्या व्यसनाला शिवले नाही.त्यांचे आचरण शुद्ध होते म्हणूनच समाज सुधारला.ज्याचे आचरण शुद्ध नाही, त्याचा परमार्थ,राजकारण किंवा समाजकारण काहीच शुद्ध असू शकत नाही.जे पंचशीलाचे पालन करतात,तेच खरे धम्माचे लोक आहेत आणि तेच खरे वारकरी आहेत.महाराष्ट्रात राहणारा प्रत्येक शोषित आणि सामान्य माणूस हा एकाच मातीचा आहे, ही समतेची भावना संत तुकाराम महाराजांनी रुजवली. यावेळी राईबाई वाघमारे, मस्के मामी,रानुबाई किसन डोंगरे, शिलाबाई अभिमान सोनवणे,मंदा वाळके, आशावर्कर मिराताई वाघमारे, सुवर्णा कांबळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला ललिता बनसोडे, ज्योती बनसोडे, सिद्धांत बनसोडे,कौसल्या पंडित,अशोक शिखरे, माऊली बोराटे, सिद्धार्थ वंसाळे,रमेश कांबळे ,दत्ताभाऊ गायकवाड ,दिलीप पवार,सुरज गायकवाड,राहुल सोनवणे, लक्ष्मण जोगदंड, मुकुंद रणदिवे, प्रदीप टोपे , बी बी शिंदे, अशोक गायसमुद्रे, धुराजी शिंदे, दीपक भालेराव, सुधाकर इंगळे, रोहिदास वाघमारे,अशोक वाघमारे, रामभाऊ ठोके, गोविंद गाडे ,राजा नायक ,सामाजिक कार्यकर्ते सुनिता पाटोळे तसेच स्वप्न रुपी महिला बचत गट- विद्या जालिंदर खरात,आयुष्य महिला बचत गट- सुवर्णा लखन काकडे,आई महिला बचत गट -अध्यक्ष गवळण अशोक शिखरे, सम्राट महिला बचत गट -स्नेहलता पाटोळे, ममता महिला बचत गट-ज्योती शिंदे ,आदिती महिला बचत गट -पूजा अशोक डोंगरे(पाटोळे), श्रद्धा महिला बचत गट -प्रवीण पठाण, तनिष्का महिला बचत गट- सारिका गायकवाड,खुशी महिला बचत गट -राणी हजारे (पाटोळे),भिमाई महिला बचत गट,रमाई महिला बचत गट,सावित्री महिला बचत गट,गौतमी महिला बचत गट,यशोधरा महिला बचत गट,अहिल्या महिला बचत गट,द्वारकाबाई महिला बचत गट आदी बचत गट व नागरिक उपस्थित होते.

# पिं.चिं.मध्ये पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिके मार्फत नाममात्र दरात टँकरने पाणीपुरवठा करावा-नगरसेविका श्रुती वाकडकर यांची आयुक्तांकडे मागणी

**पिंपरी:**-पिंपरीचिंचवड शहरात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून अनेक भागांतील नागरिकांना पिण्याच्या व दैनंदिन वापराच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना तातडीचा दिलासा मिळावा यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नाममात्र दरात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका तथा शिक्षण समिती सदस्या सौ. श्रुती राम वाकडकर यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शहराचा गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून लोकसंख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना खासगी टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असून त्यासाठी दरमहा लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. यामध्ये एक बाब विशेष लक्षात घेण्यासारखी आहे की, खासगी टँकर चालकांना मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत असून ते संपूर्ण शहरात पाणीपुरवठा करत आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांना पाणीपुरवठा करणे ही महानगरपालिकेची मूलभूत जबाबदारी असल्याने, महानगरपालिकेनेही आवश्यकतेनुसार भाडेतत्त्वावर टँकर उपलब्ध करून नागरिकांना खाजगी टँकरपेक्षा नाममात्र दरात पाणीपुरवठा करावा, अशी ठाम मागणी सौ. श्रुती वाकडकर यांनी केली आहे. शहरातील पाणीटंचाईचे संकट पूर्णपणे दूर होईपर्यंत महानगरपालिकेने विशेष उपाययोजना राबवून टंचाईग्रस्त भागांमध्ये सवलतीच्या दरात टँकरने पाणी उपलब्ध करून द्यावे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. महानगरपालिकेने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.